10-04-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 09-04-2025 21:51 Page 1



# बोरी पूल प्रकल्पाविरोधात शेतकरी उच्च न्यायालयात

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ९ :** पारंपरिक खाजन जमिनी वाचवण्यासाठी प्रस्तावीत बोरी पुलाच्या मार्गाला आपला विरोध कायम ठेवत लोटली – बोरी येथील शेतकऱ्यांनी आता उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. राष्ट्रीय हरित लवादाकडून अपेक्षित आणि वेळेत निकाल मिळण्याची शक्यता मावळल्यानंतर लोटली बोरी येथील शेतकऱ्यांनी एकत्र येत पया पुलाविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यामूळे खाजन जमिनी संरक्षणाचा लढा आता आणखी तीव्र झाला आहे.

आणि बोरीम गावांतील शेतकऱ्यांनी त्यांच्या पारंपरिक खाझान शेतजमिनींच्या रक्षणासाठी आणि प्रस्तावित **बोरीम पूल प्रकल्पाच्या बांधकामाला विरोध करण्यासाठी** मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. राष्ट्रीय हरित लवादाकडून अपेक्षित मदत न मिळाल्यानंतर त्यांनी हा कायदेशीर लढा अधिक तीव्र केला आहे.

याचिकाकर्त्यांनी १९ ऑक्टोबर २०२३ आणि ११ ऑक्टोबर २०२४ रोजी राष्ट्रीय महामार्ग कायद्यांतर्गत जारी केलेल्या भूसंपादन अधिसूचनांना आव्हान दिले आहे. पर्यावरणीय दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील असलेल्या १.५७ लाख चौरस मीटरपेक्षा जास्त खाझन जमिनींचे संरक्षण धोक्यात आले आहे असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे .

स्थानिक समुदायांवर होणारा आर्थिक परिणामही गंभीर ठरू शकतो. कार्बोट, कॅन्टोर, मकासाना आणि बेब्दो टेनंट्स असोसिएशन यांच्या २.१८ कोटी रुपयांहून अधिक मूल्यासह बाधित जमिनीतून दरवर्षी २.७३ लाख किलो सेंद्रिय तपकिरी तांदूळ उत्पादन होते. तसेच, कार्बोट आणि कॅन्टोर या दोन स्लूइस गेट्सवरील मासेमारी



हक्कांमधून समुदायाला सुमारे ६० लाख रुपयांचा वार्षिक महसूल मिळतो, असे याचिकेत नमूद करण्यात आले आहे .

लोटलीमधील सात भाडेकरू संघटना सध्या खाझन क्षेत्रात शेती करत आहेत. मात्र, प्रस्तावित पूल प्रकल्पामुळे कार्बेट, कॅन्टोर, मस्कासाना, बेब्दो भाडेकरू संघटना आणि लोटली खाझन भाडेकरू संघटनेच्या सुमारे १० हेक्टर जमिनी नष्ट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. उर्वरित पाच संघटनांच्या जमिनींवरही गंभीर परिणाम होईल, ज्यामुळे त्यांची लागवड आर्थिकदृष्ट्या अशक्य होऊ शकते.

यामुळे ४,००० हून अधिक स्थानिक रहिवासी विस्थापित होतील किंवा त्यांचे उपजीविकेचे नुकसान होईल. विशेष म्हणजे, यातील अनेक जण अनुसूचित जमातींतील असून, त्यांच्या हक्कांचे संरक्षण अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, १९८९ अंतर्गत आहे, असे याचिकेत म्हटले आहे .

न्यायालयीन कागदपत्रांनुसार, हा पूल प्रकल्प २०२५ पर्यंत मुरगाव बंदरातील कोळसा हाताळणी क्षमता १२ एमटीपीए वरून ५० एमटीपीए पर्यंत वाढवण्याच्या योजनांचा भाग असण्याची शक्यता आहे. झुआरी नदीकाठच्या विविध जेटींमधून कोळसा वाहतूक करण्याच्या योजनेमुळे सावर्डे, पंचवाडी आणि शिरोडा यासारख्या गावांवर परिणाम होऊ शकतो, असे याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

याचिकाकर्त्यांचा आरोप आहे की, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयासह इतर प्रकल्प भागीदारांनी आवश्यक पर्यावरणीय मंजुरी न घेता प्रकल्प पुढे नेला आहे. पर्यावरणीय नुकसानीसाठी पर्यायी उपाय योजले गेले नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. याचिकाकर्त्यांनी दावा केला आहे की, पिढ्यान्पिढ्या आदिवासी समुदायांनी खाझन जमिनींची लागवड केली असली तरी, त्यांची नावे अधिकृत जमिनीच्या नोंदीत केवळ भाडेकरू म्हणूनच दिसतात.

वास्तविक, ही जमीन पूर्वी गावकरी जमिन (सामुदायिक मालकी) होती, पण कालांतराने ती अन्य समुदायांकडे गेली, असा आरोप करण्यात आला आहे.

गोवा राज्य हवामान बदल कृती आराखड्यानुसार, राज्यातील १५% पेक्षा जास्त जमीन वारंवार पुराच्या धोक्यात आहे. खाझन क्षेत्र हवामान अनुकूलनात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने, या जमिनी नष्ट झाल्यास गोव्याच्या हवामान–संवेदनशीलतेवर गंभीर परिणाम होईल, असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. याचिकाकर्त्यांनी भूसंपादन प्रक्रियेला स्थगिती देण्याची आणि त्यांच्या जमिनीवरील ताबा कायम ठेवण्यासाठी तात्काळ अंतरिम दिलाश्याची मागणी केली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचा पुढील निर्णय स्थानिक शेतकरी आणि पर्यावरणीय संवेदनशीलतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

---

## निवडक

### फोंडा येथे प्रवेश बंदचा आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ९ :** दक्षिण गोवा जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्यांनी फोंडा येथील डॉ. नारायण उसगावकर दवाखान्यासमोर प्रवेश बंदचा आदेश दिला आहे.

### वास्कोकडे जाणाऱ्या रस्त्यावर गतिरोधक उभारण्याचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. ९ :** दक्षिण गोवा जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्यांनी वरुणपुरीहून वास्कोकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर, वास्को, मुरगाव येथील मांगोर हिल येथील गॅरिसन अभियंता (प्रकल्प) कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून सुमारे १० मीटर अंतरावर हम्प प्रकारचा गतिरोधक आणि एक ब्लिंकर बसवण्याचा आदेश दिला आहे. त्याचप्रमाणे, दाबोलीहून बोगमाळो बीचकडे जाणाऱ्या अंतर्गत रस्त्यावर, मशरूम हॉटेल, मुरगांव समोरील चार रस्त्यांच्या जंक्शननंतर सुमारे २० मीटर अंतरावर हंप प्रकारचा गतिरोधक उभारण्याचा आदेश दिला आहे.

### बेकायदेशीर कारवाया रोखण्यासाठी भरारी पथकाची स्थापना

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ९ :** उत्तर गोवा जिल्हाधिकारी कार्यालयाने बेकायदेशीर जमीन भरणे, बेकायदेशीर डोंगर कापणी आणि बेकायदेशीर बांधकामांना आळा घालण्यासाठी तालुका पातळीवर एक भरारी पथकाची स्थापना केली आहे आणि मामलेदार, तलाठी आणि भरारी पथकांसह स्थानिक अधिकाऱ्यांना अशा बेकायदेशीर गोष्टी शोधणे, तपासणी करणे आणि कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. सर्वसामान्य जनतेला आवाहन करण्यात येते की त्यांनी अनधिकृ, बेकायदेशीर बांधकाम, बेकायदेशीर जमीन भरणे किंवा डोंगर कापण्याचे कोणतेही प्रकरण आढळल्यास खालील तालुकास्तरीय भरारी पथकाकडे संपर्क क्रमांक तिसवाडी – ९९२३०२३३१२, बार्देश – ८७६६०२२९३१, डिचोली – ९९६०८५२०५८, सत्तरी – ८७६६०४७४०७, पेडणे – ९५४५००८७५२ वर कॉल करून किंवा व्हॉट्सअॅप संदेश (फोटोसह ३० शब्दांपर्यंत) पाठवून तक्रार करावी. उत्तर गोवा जिल्हा नियंत्रण कक्षाच्या ०८३२–२२२५३८३ आणि आपत्कालीन हेल्पलाइन क्रमांक १००/११२ वरही तक्रारी नोंदवता येतील.

### पणजी येथे आज राष्ट्रीय सर्वेक्षण दिन समारंभ

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ९ :** येथील मालमत्ता आणि भू–नोंदणी संचालनालयाच्यावतीने १० एप्रिल २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता पणजी येथील मिनेझीस ब्रागांझा संस्थेच्या सभागृहात राष्ट्रीय सर्वेक्षण दिन साजरा करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात महसूल मंत्री आतानासियो मोन्सेरात, प्रमुख पाहुणे आणि महसूल खात्याचे संयुक्त सचिव सुरेंद्र नाईक सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

### पाळी बाजार ट्रान्सफॉर्मरवर आज खंडित वीजखंडित

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ९ :** गुरुवार दि. १० रोजी पाळी बाजार वीज ट्रान्सफॉर्मरवर सकाळी ९.३० ते दुपारी २ यावेळेत नवीन वीज वाहिन्या घालायच्या असल्याने वरील वेळेत पाळी बाजार येथे वीजपुरवठा असणार नाही.यावेळी ग्राहकांनी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

### असोल्णा, दवर्ली भागात आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ९ :** ११ केव्ही असोल्णा फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने १० रोजी सकाळी ९.३० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत असोल्णा ग्रामपंचायत अंतर्गत मुळेवाडो, बायल्फोल, गिंडे अपार्टमेंट, संतवाडो, बांदा, सेंट जोसेफ चॅपेल, ओरेल भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे ११ केव्ही दवर्ली फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने १० एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत बागा झोरीवाड्डो, पुंडलिकनगर, वासुदेव नगर, लयामती, तळेबांद, इंदोना, दत्तमदीर परिसर आणि संपूर्ण दवर्ली पंचायत भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

### नावेली भागात आज, उद्या वीज पुरवठा खंडित

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ९ :** ११ केव्ही नावेली फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. ११ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत असोल्णा ग्रामपंचायत अंतर्गत मुळेवाडो, बायल्फोल, गिंडे अपार्टमेंट, संतवाडो, बांदा, सेंट जोसेफ चॅपेल, ओरेल भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे ११ केव्ही दवर्ली फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. १० रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत डोंगरी शिरोडकर, एल अँड एल पर्ल, डोंगरी चॅपेल, लिएंड्री, मॅट्रिक्स, रावणफोंड ते नावेली रोड आणि लायब्ररी भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

### पांडव चॅपल ट्रान्सफॉर्मरवर उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ९ :** ११ केव्ही पांडव चॅपल ट्रान्सफॉर्मरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. ११ रोजी सकाळी ९.०० ते संध्या ६.०० वाजेपर्यंत असोल्णा ग्रामपंचायत अंतर्गत मुळेवाडो, बायल्फोल, गिंडे अपार्टमेंट, संतवाडो, बांदा, सेंट जोसेफ चॅपेल, ओरेल भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे ११ केव्ही दवर्ली फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार १० रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत परमसुख को–ऑप. सोसायटीसमोरील इदिन्हा अपार्टमेंट, अग्निशमन केंद्रासमोरील ईगल हाऊस, पद्मा मेडिकल स्टोअर, टीबी कुन्हा स्कूल, क्ले आर्ट, हॉटचिप्स, लुईस–ए–नाना मेसन हाऊस आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

### आरोसी फिरडवर दुरुस्ती उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ९ :** ११ केव्ही आरोसी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. ११ रोजी सकाळी ९ ते दुपारी २.०० वाजेपर्यंत बागा, कांसावली चर्च, झेंडो, पोस्ट कार्ड, कोट्टारवाडो, कुयेली आणि पीएचसी भागात वीज पूरवठा केला जाणार नाही. त्याचप्रमाणे ११ केव्ही नार्वा फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. ११ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत मुर्डी नार्वा, तिखाजन आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

### जुने गोवे भागात उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ९ :** ११ केव्ही जुने गोवे फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने शुक्रवार दि. ११ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत नाईक नवरे, विवा गोवा, कदंबा हाऊसिंग सोसाईटी, उत्तम दर्शन, सल्ले ५९, नावेलकर प्राईड, हरबन्स विहार, बेलमोंत आणि कदंबा पठार भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

# गनपावडर स्फोट प्रकरण; कंपनीची एनओसी रद्द

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ९ :** नाकेरी येथे २० मार्च रोजी घडलेल्या गनपावडर स्फोट आणि आगीच्या घटनेनंतर दक्षिण गोवा जिल्हाधिकारी एग्ना क्लीटस यांनी ह्यूजेस प्रिसिजन मॅन्युफॅक्चरिंग प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला पूर्वी दिलेले ना हरकत प्रमाणपत्र तात्काळ रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

तथापि, पेट्रोलियम आणि स्फोटक सुरक्षा संघटना तसेच स्फोटक नियमांचे पालन करून कंपनीला पुन्हा एनओसीसाठी अर्ज करण्याची मुभा देण्यात आली आहे, असे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

२० मार्च रोजीच्या घटनेच्या चौकशीसंदर्भात संबंधित विभागांकडून प्राप्त झालेल्या अहवालांच्या आधारे हा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये 'पेसो' च्या संयुक्त मुख्य नियंत्रकांनी ७ एप्रिल रोजी पाठवलेल्या ईमेलचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, कंपनीने आपल्या एनओसी अंतर्गत असलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात गंभीर त्रुटी दाखवल्या आहेत. सुरक्षेच्या नियमांचे पद्धतशीर उल्लंघन केल्याने सार्वजनिक सुरक्षा आणि पर्यावरण संरक्षण धोक्यात आले आहे. त्यामुळे प्रमाणपत्र तत्काळ मागे घेणे आवश्यक झाले आहे.

याशिवाय, मॅगझीन क्रमांक २ला परवाना नसताना स्फोटकांचा साठा करण्यात आला, हे २००८ च्या स्फोटक नियम ७ चे सरळ उल्लंघन असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. तसेच, अनधिकृत स्फोटक साठवणूक आढळल्याने त्या विभागाला एनओसी मंजूर करता येणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. कंपनीने केलेल्या गंभीर नियमभंगामुळे संभाव्य धोके वाढले असून जबाबदारी निश्चित करण्यासाठी तत्काळ एनओसी रद्द करणे आवश्यक आहे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी आदेशात सांगितले आहे.

नाकेरी – बेतुल येथील ग्रामस्थांनी दक्षिण गोवा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मूक मोर्चा काढल्यानंतर प्रशासनाने हा निर्णय घेतला.मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनीही यापूर्वी स्पष्टपणे सांगितले होते की, कंपनीने सर्व सुरक्षा मार्गदर्शक तत्त्वे आणि नियमांचे पालन केल्याशिवाय त्यांना पुन्हा काम सुरू करण्याची परवानगी दिली जाणार नाही. स्फोटाच्या घटनेनंतर 'पेसो' ने २१ मार्च रोजी कंपनीला प्रोपेलंट साठवण्यास आणि वाहतूक करण्यास दिलेले परवाने निलंबित केले होते.

प्राथमिक चौकशीत असे आढळले की, या अपघातामुळे कंपनीच्या मॅगझिनचा वापर सुरक्षित राहिलेला नाही आणि हा प्रकार २००८ च्या स्फोटक नियम ११८(२)(ळळ) आणि १३१ चे उल्लंघन आहे. कुंकळ्ळी पोलिसांनी ह्यूजेस प्रिसिजन मॅन्युफॅक्चरिंग प्रायव्हेट लिमिटेडच्या व्यवस्थापन आणि कर्मचाऱ्यांविरुद्ध निष्काळजीपणा आणि मानवी जीव धोक्यात आणल्याच्या आरोपाखाली एफआयआर नोंदवला आहे.

---

# अन्यायकारक शुल्क वसूलीविरोधात मच्छीमार संतप्त

**घाऊक मासळी बाजार बंद करण्याचा इशारा**

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ९ :** वास्को ते बेतुलपर्यंतच्या सासष्टी आणि मुरगाव किनारपट्टीवर कार्यरत असलेल्या पारंपरिक मच्छीमार आणि बोटमालकांनी बुधवारी दक्षिण गोवा नियोजन आणि विकास प्राधिकरण (एसजीपीडीए) कार्यालयाबाहेर तीव्र आंदोलन केले. बाजारात सुरू असलेल्या कथित अन्यायकारक व्यवहारांविरोधात आवाज उठवत, त्यांनी तक्रारींचे निराकरण न झाल्यास घाऊक मासळी बाजार बंद करण्याचा इशारा दिला.

मच्छीमारांनी बाजारातील व्यवस्थापनावर अन्यायकारक शुल्क वसुली आणि मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या दंडाविरोधात संताप व्यक्त केला. त्यांचा आरोप आहे की, प्राथमिक भागधारक असूनही त्यांच्यावर अवास्तव शुल्क लादले जात आहे. याशिवाय, एसजीपीडीए आणि मडगाव नगरपरिषद यांचे कंत्राटदार बाजारात दुहेरी कर आकारत असल्याचा दावा करत, त्यांनी या अन्यायकारक वसुलीला कडाडून विरोध केला.

सकाळपासून आंदोलन सुरू असतानाही, मच्छीमारांना एसजीपीडीए सदस्य सचिवांची भेट घेण्यासाठी दुपारपर्यंत प्रतीक्षा करावी लागली. यानंतर, एसजीपीडीएअध्यक्ष आणि वास्कोचे आमदार कृष्णा साळ कर यांच्याशी फोनवर चर्चा झाली. पुढील चर्चा आणि निर्णय घेण्यासाठी १० एप्रिल रोजी बैठक बोलावण्यात आली असून, तोपर्यंत जुन्या शुल्क संरचनेला पूर्ववत करण्याची मागणी करण्यात आली आहे. कुटबण फिशरीज को–ऑपरेटिव्ह सोसायटीचे अध्यक्ष सॅव्हियो डिसिल्वा आणि गोवा फिशिंग बोट ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष जोस फिलिप डिसोझा यांनी या निदर्शनांचे नेतृत्व केले. त्यांनी फातोर्डाचे आमदार आणि एसजीपीडीए बोर्ड सदस्य विजय सरदेसाई यांची भेट घेतली. मच्छीमारांवरील दुहेरी कर आकारणीचा मुद्दा उपस्थित करत, या अन्यायाविरोधात जनहित याचिका दाखल करण्याचा सल्ला सरदेसाईंनी दिला.

सरदेसाई यांनी भाजप सरकारवर गंभीर आरोप करत एसजीपीडीए घाऊक बाजाराच्या वाढीव शुल्क रचनेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी सांगितले की, जानेवारी महिन्यातील एसजीपीडीए बोर्डाच्या शेवटच्या बैठकीत फक्त किरकोळ बाजाराच्या शुल्क वाढीस मंजुरी देण्यात आली होती. त्यांनी या मुद्द्यावर जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेण्याचे मच्छीमारांना आवाहन केले आणि हा सर्वसामान्य ग्राहकांच्या हिताचा प्रश्न असल्याचे स्पष्ट केले.

उच्च न्यायालयाच्या निर्देशांकडे दुर्लक्ष करून निविदा प्रक्रियेत चालढकल केल्याचा आरोप सरदेसाईंनी केला. यामागे काही विशिष्ट कंत्राटदारांना बाजारावर नियंत्रण ठेवण्याची मुभा देण्याचा हेतू असल्याचे त्यांनी म्हटले. सध्याच्या निविदा शुल्क संरचनेमुळे अनेक संभाव्य बोलीदारांना अडचणी येत असून, हे इतर व्यापाऱ्यांसाठी अडथळा ठरत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. डिसिल्वा आणि डिसोझा यांनी एसजीपीडीए प्रशासनावर त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. गरज पडल्यास मडगाव नगरपरीषदेकडेही धाव घेण्याचा इशारा देत, त्यांनी अवास्तव शुल्क रद्द करण्याची आणि कंत्राटदारांकडून सुरू असलेली खंडणी थांबवण्याची मागणी केली. त्यांच्या इशाऱ्यानंतर प्रशासन या प्रश्नांवर त्वरित पावले उचलते की नाही, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

# आसगाव पठारावर कचरा टाकण्यास राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाची बंदी

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ९ :** पर्यावरणीय संरक्षणाला गती देत, गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने म्हापसा नगर परिषदेला आसगाव पठारावर कचरा टाकण्यास तात्काळ बंदी घालण्याचे निर्देश दिले आहेत. ही कारवाई वाढत्या पर्यावरणीय संकटाला आळा घालण्यासाठी आणि शाश्वत कचरा व्यवस्थापन प्रणाली प्रभावी करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे.

निवृत्त होणारे राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष महेश पाटील यांनी १ एप्रिल रोजी हा आदेश जारी केला. पूर्वीच्या चेतावणी आणि निरीक्षणांनंतरही म्हापसा नगरपरिषदेकडून सातत्याने नियमांचे उल्लंघन झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

मंडळाने पठाराच्या सद्यस्थितीचे मूल्यमापन करण्यासाठी आणि सुधारणा झाल्या आहेत का, हे पाहण्यासाठी सर्व संबंधित विभागांसोबत संयुक्त स्थळनिरीक्षण करण्याचे निर्देश दिले आहेत. हे निरीक्षण आदेश जारी केल्यानंतर सात दिवसांच्या आत पूर्ण होणे आवश्यक आहे.

२०२३ मध्ये राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने आसगाव कोमुनिदाद आणि म्हापसा नागरी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आसगाव डंपिंग ग्राउंडची तपासणी केली. तपासणीत सामुदायिक जमिनीवर मोठ्या प्रमाणात मिश्र कचरा अनधिकृतपणे टाकण्यात येत असल्याचे आढळले.

त्यानंतर मंडळाने नगरपरिषदेला ही कृती त्वरित थांबवण्याचे आणि सुधारात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. मात्र, या निर्देशांकडे दुर्लक्ष झाल्यानेराज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने औपचारिक नोटीस बजावली. या नोटीसमध्ये अनधिकृत कचरा विल्हेवाट थांबवण्याचे आणि या कारवाईबाबत स्पष्टीकरण देण्याचे आदेश देण्यात आले. मात्र, नगरपालिकेकडून समाधानकारक उत्तर न मिळाल्याने मंडळाने वैयक्तिक सुनावणीचे वेळापत्रक निश्चित केले. सुनावणीत म्हापसा नगर परिषद, गोवा कचरा व्यवस्थापन महामंडळ आणि उपजिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. चर्चेनंतर, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने आसगाव पठारावर डंपिंग थांबवण्याचे अंतिम आदेश जारी केले.

आसगाव पठारावरील कचरा विल्हेवाट बंद करण्याबरोबरच, एमएमसी ला कुचेली येथील प्राथमिक कचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळा कडून आवश्यक मंजुरी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

यामध्ये हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा आणि पाणी (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत मंजुरी घेण्याचा समावेश आहे. गोव्यातील पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील भागांमध्ये, विशेषतः आसगावसारख्या ठिकाणी, पर्यावरणीय मानके काटेकोरपणे पाळली जात आहेत की नाही, हे सुनिश्चित करण्यासाठी ही प्रक्रिया राबवली जात आहे.

म्हापसा शहरातील चिकन कचऱ्याच्या गैरव्यवस्थापनावरही राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने ने चिंता व्यक्त केली आहे. नवीनतम आदेशानुसार, हा कचरा फक्त अधिकृत संग्राहकांनाच देण्यात यावा आणि आसगाव परिसरात टाकला जाऊ नये. असे असतानाही, अनधिकृत डंपिंग सुरू असल्याचे आढळून आले आहे.

---

# रात्री मोठ्या संगीत वाजवणाऱ्या आस्थापनांसाठी सीसीटीव्ही बसवण्याची सक्ती होणार?

ऑगस्टो रॉड्रिग्ज
■ टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. ९ :** रात्री १० नंतर मोठ्या आवाजात संगीत वाजवणाऱ्या आस्थापनांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याबाबत अनुपालन अहवाल सादर करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने दोन आठवड्यांची मुदत दिली आहे. न्यायालयाचे हे आदेश ध्वनी प्रदूषणाच्या नियंत्रणासाठी नवी दिशा ठरू शकतात असे मत कार्यकर्त्यांनी व्यक्त केले आहे.

मंगळवारी झालेल्या सुनावणीदरम्यान, गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि उत्तर गोवा उपविभागीय जिल्हाधिकारी यांना न्यायालयाच्या १८ फेब्रुवारीच्या आदेशाच्या पालनाचा अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. २०२३ मध्ये दाखल अवमान याचिकेच्या सुनावणीवेळी हा आदेश जारी करण्यात आला होता.

न्यायमूर्ती भारती डांगरे यांनी सुनावणीदरम्यान महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करत विचारले, सीसीटीव्ही बसवणे ही अनिवार्य अट का असू नये? आणि परवानगी देण्यापूर्वीच याची अंमलबजावणी का होऊ नये ?

राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने वकिल मनीष साळकर यांनी स्पष्टीकरण देताना सांगितले की, या आस्थापनांमध्ये ध्वनी पातळीचे निरीक्षण ध्वनी निरीक्षण प्रणालीद्वारे केले जात आहे. त्यांनी न्यायालयाला खात्री दिली की ही प्रणाली कार्यरत आहे आणि ध्वनी प्रदूषणाचा मागोवा ठेवण्यात येत आहे. मात्र, न्यायमूर्ती डांगरे यांनी अहवाल देण्याच्या प्रक्रियेच्या वेळेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. वाचन पाठवण्यासाठी किती वेळ लागतो आणि कोणाकडे पाठवला जातो? असा त्यांनी सवाल केला.

वकिल साळकर यांनी उत्तर दिले की, प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालय, पोलिस आणि उपविभागीय कार्यालयाकडे ध्वनी पातळीचे अहवाल पाठवले जातात. नागपूरमधील एका घटनेचा संदर्भ देत न्यायमूर्ती डांगरे यांनी नमूद केले की, पोलिसांनी पोर्टेबल डेसिबल मॉनिटरिंग युनिट्स मिळवले होते, पण त्या ठिकाणी पोहोचेपर्यंत संगीत आधीच बंद झाले होते. त्यामुळे त्वरित उपाययोजनांची गरज अधोरेखित झाली.

न्यायालयाने नियुक्त केलेल्या नॉइज मॉनिटरिंग कमिटी चे सदस्य कॅप्टन जेरी फर्नांडिस आणि कमलाकर नाईक यांनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची शिफारस केली होती. ही सूचना उच्च न्यायालयाने आणि महाधिवक्त्यांनी स्वीकारली असल्याची माहिती अमिकस क्युरी (न्यायालयीन सहायक) अॅड. निगेल कोस्टा फ्रियास यांनी दिली.

साळकर यांनी युक्तिवाद केला की, आम्ही सीसीटीव्ही बसवण्याचा समावेश करणार नाही, कारण आम्ही आधीच सर्व आस्थापनांना ध्वनी निरीक्षण प्रणाली बसवण्यासाठी एक शुद्धिपत्रक जारी केले आहे. मात्र, न्यायमूर्ती डांगरे यांनी सीसीटीव्ही बसवण्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि विचारले, ते आधीच केले गेले आहे, की अजूनही प्रक्रिया सुरू आहे?

साळकर यांनी स्पष्ट केले की, मोठ्या आवाजात संगीत वाजवणाऱ्या आस्थापनांना परवानगी देण्याचे अधिकार एसडीएम कार्यालयाकडे आहेत आणि त्यामुळे सीसीटीव्ही बसवण्याचा आदेश त्यांच्याकडून यावा लागेल. आम्ही जीपीसीबी केवळ संमती देतो. मात्र, आम्ही सीसीटीव्ही बसवण्याच्या सूचना देऊ शकतो का, हे तपासण्याची गरज आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. सुनावणीदरम्यान न्यायालयाने स्पष्ट केले की, रात्रीच्या वेळी मोठ्या आवाजात संगीत वाजवणाऱ्या आस्थापनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासंदर्भात गंभीर विचार करण्याची गरज आहे. यासंदर्भात पुढील सुनावणीदरम्यान न्यायालय अंतिम निर्णय देईल.

---

# धारगळ सरपंचपदी दाजी शिरोडकर



**धारगळ : सरपंचपदी दाजी शिरोडकर यांची निवड झाल्यानंतर सोबत पंचायत मंडळ.**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ९ :** धारगळच्या सरपंचपदी दाजी शिरोडकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच सतीश धुमाळ यांनी मागच्या पंधरा दिवसांपूर्वी सरपंच पदाचा राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्त होते. ९ रोजी पंचायत मंडळाची सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली. त्यावेळी दाजी शिरोडकर यांचा एकमेव सरपंच पदासाठी अर्ज आल्यामुळे त्यांची बिनविरोध सरपंच म्हणून निवड जाहीर करण्यात आली. यावेळी पंच दीप्तीशा नारोजी, प्रीती कानोळकर, अर्जुन कानोलकर, अनिकेत साळगावकर, सतीश धुमाळ, दिलीप वीर आधी पंच सदस्य उपस्थित होते.

नवनिर्वाचित सरपंच दाजी शिरोडकर यांनी प्रतिक्रिया देताना आपल्यावर पंच सदस्यांनी जो विश्वास दाखवलेला आहे, त्याला आपण पात्र करून दाखवणार पंचायत क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सरकारच्या सहकार्यातून प्रत्येक प्रभागांमध्ये विकास कामे केली जाईल, असे ते म्हणाले.